सरकार–वि–प्रकाश

निशाणी क्र. ०९.

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.०७ यांची साक्ष–**
**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की,**

**नाव – सरला उत्तमराव वाटकर,**
**वय – ४० वर्ष.**
**धंदा – घर काम.**
**पत्ता – ईसमाईल भाई ले–आऊट, त. कळमेश्वर, जि.नागपूर.**

**सरतपास सरकार तर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.ए.एस.बिहाऊत वकिलांमार्फत.**

१) मी आरोपीला ओळखते. तो माझ्या घराच्या मागे राहतो. घटना दिनांक ०२.०६.२०१७ रोजी सायंकाळी च्या दरम्यान माझ्या घराच्या पुढे हनुमान मंदीरामध्ये घडली होती. त्या दिवशी सायंकाळच्या वेळेला आरोपीची आई चन्द्रकलाबाई यांनी आम्हाला हनुमान मंदिरामध्ये मिटींग आहे, त्यामुळे चला असे म्हटले होते. त्यामुळे, मी व मोहल्ल्यातील ४० ते ५० मानसे हनुमान मंदिरामध्ये जमलो. सदर मिटींग ले–आऊटबाबतची होती. आम्ही एकमेकांशी बोलत असतांना आरोपी प्रकाश तेथे धावत आला. त्याने आम्हाला म्हटले की,'' सर्व भांडण या मुर्तीमुळेच आहे'' त्यानंतर आरोपीने हालवून हालवून हनुमानची मुर्ती पाडून टाकली. त्यानंतर, आरोपीचे वडील अर्जुन शेन्डे तेथे आले. त्यांनी हनुमानची पडलेली मुर्ती उभी केली. त्यानंतर, आम्ही पोलीस ठाणे, कळमेश्वर येथे जाऊन आरोपीविरुध्द रिपोर्ट दिली. आता मला सदरची रिपोर्ट दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. १०** देण्यात येते. आता मला छापील नमुन्यातील प्रथम खबरी अहवाल दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी क्र. ११** देण्यात येते. पोलीसांनी माझे बयान नोंदविले होते. आरोपी आज रोजी न्यायालयात हजर आहे.

**उलट तपासणी आरोपीतर्फे सौ. व्हि.डी. शेवाळे वकिलांमार्फत.**

२) हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्यावेळेला हनुमान मंदिराला सुरक्षा भिंत नव्हती. सदर

DISTRICT COURT NAGPUR

मुर्तीची स्थापना एका छोट्या वट्यावर करण्यात आली होती. मुर्ती भोवती मंदिर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, मुर्ती समोरील तिन ते चार हाताचा सिमेंटचा रस्ता आहे व त्याच्या बाजुला दोन लोकांचे घर आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ४० ते ५० मानसे पटांगणामध्ये बसून चर्चा करित होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिटींग ले–आऊटबाबत चर्चा करण्यासाठी आयोजित करण्यात आली होती, दुसरा कोणताही मुद्दा मिटींगचा नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी सुध्दा इतर व्यक्तींशी चर्चा करित होती. हे म्हणणे खरे नाही की, मी चर्चेमध्ये व्यस्त असल्यामुळे आरोपीने काय कृत्य केले, हे मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीवर मुर्ती पाडल्याच्या आड घेतल्यामुळे आरोपीने आमच्या विरोधात कुठलीही कार्यवाही करु नये म्हणून मी सदर तक्रार दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासात सांगितल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझे आज रोजी आरोपीशी बोलणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास संपला.

फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष

दिनांक – २१/०८/२०१९.
कळमेश्वर.

(ह.ना. पोले)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र. २, कळमेश्वर.

DISTRICT COURT NAGPUR

सरकार–वि–प्रकाश
निशाणी क्र. ०९.

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – एस.डी. भिमटे

DISTRICT COURT NAGPUR